कर्तव्यावर असलेल्या परिचारिकेचा विनयभंग करीत दमदाटी

जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयातील घटना

■ **जळगाव । प्रतिनिधी**

येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील कक्ष क्रमांक १२ येथे एका परिचारिकेला विनयभंग करून दमदाटी केल्याचा धक्कादायक प्रकार सोमवार दि. १२ मे रोजी संध्याकाळी साडेसात वाजेच्या सुमारास घडला आहे. याप्रकरणी जिल्हापेठ पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे जिल्हाभरातील रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात. या ठिकाणी कक्ष क्रमांक १२ येथे संजय अनिल भोई (रा. एरंडोल) याचा अपघात झाल्याने तो कक्षामध्ये उपचार घेत आहे. सोमवार दि. १२ मे रोजी संध्याकाळी साडेसात वाजेच्या सुमारास फिर्यादी परिचारिका ह्या कर्तव्यावर असताना संशयित आरोपी गोलू वंजारी (रा. एरंडोल) याने परिचारिकेजवळ येऊन, त्यांना लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. याबाबत जाब विचारला असता गोलू वंजारी यानी, तुला काय करायचे ते कर असे म्हणत दमदाटी केली. यावेळी कर्तव्यावर असलेल्या सुरक्षारक्षकाने त्याला बोलण्यास गेले असता सुरक्षारक्षकाला देखील दमदाटी करून धक्काबुक्की करीत संशयित आरोपी गोलू वंजारी तिथून निघून गेला. याबाबतची फिर्याद जिल्हापेठ पोलीस स्टेशनला परिचारिकेने दाखल केली आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक शांताराम देशमुख करीत आहेत.

जळगावात गुंडांचा हैदोस, घरांवर दगडफेक करीत केली वाहनांची तोडफोड

एमआयडीसी पोलीस ठाण्यात १० ते १३ जणांवर गुन्हे दाखल

■ **जळगाव । प्रतिनिधी**

शहरातील तुकारामवाडी परिसरात मध्यरात्री सुमारे अडीच ते तीन वाजेच्या दरम्यान काही गुंडांनी गोंधळ घालत काही घरांवर दगडफेक केली, दमदाटी केली आणि वाहनांची तोडफोड करून गंभीर नुकसान केले.

सुरेश ओतारी यांच्या खून प्रकरणातून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर हि घटना घडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शारदा सुकलाल ठाकुर (वय ४०, रा. तुकाराम वाडी) यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली आहे. संशयित आरोपी स्वप्निल उर्फ गोलू धर्मराज ठाकुर, निशांत प्रताप चौधरी, अरुण उर्फ टीनू भिमराव गोसावी, मुन्ना पहिलवान, पारस सोनवणे, बेंडा अज्या, गौरव मिस्तरी आणि ५-६ अज्ञात तरुणांनी मिळून हा हल्ला केला असल्याचे फिर्यादीत नमुद आहे.

(केसीएन)शारदा ठाकूर हे घरात पती व दोन मुलींसोबत घरात झोपलेल्या असताना अचानक दरवाज्यावर लाठ्या, काठ्या आणि दगडांचा मारा सुरू झाला. दरवाजा अर्धवट उघडल्यावर समोर गोलू ठाकुर व त्याचे साथीदार उभे होते. त्यांनी अश्लील शिवीगाळ करत दमदाटी केली.

नंतर या गुंडांनी पुढे कल्पना दिलीप बाविस्कर यांच्या घरात घुसून कल्पना आणि त्यांच्या सून प्रियंका प्रफुल बाविस्कर यांना शिवीगाळ केली आणि त्यांच्या दुचाकीचे नुकसान केले. (केसीएन)यानंतर रुपाली विजय पवार यांच्या घराजवळील कूलर खाली फेकून फोडण्यात आला. वॉशिंग मशीन आणि पाण्याच्या टाक्याही फोडण्यात आल्या. तसेच सम्राट कॉलनीतील सविता भगवान महाजन यांच्या घराच्या खिडकीची काच फोडून पल्सर मोटरसायकल व सायकलवरही दगडफेक करण्यात आली.

या गंभीर प्रकारामुळे तुकारामवाडीतील परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

मेहंदीच्या दिवशीच तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

■ **अमळनेर । प्रतिनिधी**

शहरातील सानेनगर भागातील दीपाली सुभाष पाटील या तरुणीने १५ रोजी पहाटे ३:४० वाजता स्वतःच्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली.

दीपालीचा गडखाम्ब येथिल तरुणाशी १७ रोजी विवाह होणार होता. १५ रोजी तिच्या घरी मेहंदीचा कार्यक्रम आयोजित केला होता. १४ रोजी रात्री तिच्या घराबाहेर गाणे म्हटले गेले त्यात दीपालीने नृत्यही केले होते. मात्र भल्या पहाटे तिच्या आईला ती मृत अवस्थेत दिसून आली नाही. बाजूच्या खोलीत लाईट लावलेला होता. तिने गळफास घेऊन तिचे आयुष्य संपवले होते. दरम्यान यावेळी नातेवाईकांनी आक्रोश करत हंबरडा फोडला. दिपालीच्या जाण्याने लग्न असलेल्या घरात शुकशुकाट झाला. यावेळी तीने आत्महत्या का केली याचे कारण समजू शकले नाही. पुढील तपास पो.हे.का.करीत आहे.

निधन वार्ता

मरू शंकर बाविस्कर



अंतुर्ली ता. मुक्ताईनगर । वार्ताहर । कोठा येथील मरू शंकर बाविस्कर (गुरुजी) (वय ९०) यांचे दि. १५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते सागर मुरलीधर बाविस्कर यांचे आजोबा होत.

भागवत देवराम चौधरी

अंतुर्ली ता. मुक्ताईनगर । वार्ताहर । येथील भागवत देवराम चौधरी (वय ८१) यांचे दि. १४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, भाऊ व नातवंडे असा परिवार आहे. ते सोपान देवराम चौधरी यांचे मोठे भाऊ व योगेश भागवत चौधरी यांचे वडील होत.

राधेश्याम मधुकर गारसे

चिनावल ता. रावेर । वार्ताहर । येथील रहिवासी राधेश्याम मधुकर गारसे (वय ६५) यांचे आज दि. १५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, भाऊ, सूना असा परिवार आहे. तेथील घनश्याम व खेमचंद फारसे यांचे वडील तर प्रगतिशील शेतकरी विनायक आणि निळकंठ गारसे यांचे मोठे भाऊ होत.

हाजी शफी अहमद भाईमियाँ काझी

एरंडोल । प्रतिनिधी । येथील रहिवासी धरणगाव उर्दू एज्युकेशन सोसायटीचे व अँगलो उर्दू प्रि-प्रायमरी, प्रायमरी, हायस्कूल व ज्यु.कॉलेजचे अध्यक्ष हाजी शफी अहमद भाईमियाँ काझी यांचे मंगळवार दि. १३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

बाबुराव फकीरा पाटील

पारोळा । प्रतिनिधी । येथील मा.आमदार चिमणराव पाटील यांचे काका बाबुराव फकीरा पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते आमदार अमोल पाटील व देवगावचे सरपंच समीर पाटील यांचे आजोबा तर मधुकर बाबुराव पाटील, रवींद्र बाबुराव पाटील व दिनकर बाबुराव पाटील यांचे वडील होत.

सुंदरबाई शिंदे

यावल । प्रतिनिधी । चोपडा तालुक्यातील चुंचाळे येथील रहिवासी सुंदरबाई दत्तात्रय शिंदे (पाटील) (वय ६८) यांचे दि. १४ रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांचे पश्चात पती, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या महेश व अजय आणि राधेश्याम शिंदे यांच्या आई तर दहिगाव तालुका यावल येथील पत्रकार ए. टी. चौधरी यांच्या मोठ्या भगिनी होत.

पान १ वरुन ...

अमळनेर रेल्वेस्थानकावर मालगाडीचे सात डबे...

व्यत्यय आणल्याने तिसऱ्या मार्गावरुन काम सुरु करण्यास वेळ लागणार आहे. भुसावळकडे जाणारी पॅसेंजर दोंडाईचा येथे थांबविण्यात आली आहे. सुरत-अमरावती शिंदखेडा येथे थांबविण्यात आली आहे. मेमू नंदुरबार येथे तर सुरत जाणाऱ्या ताप्ती-गंगा रावेर येथे, नांदेड-बिकानेर जळगाव येथे आणि बिकानेर धरणगाव येथे थांबवण्यात आली आहे.

१५ मे २०२५ रोजी अमळनेर स्थानकाजवळ मालगाडी घसरल्यामुळे काही गाड्यांचे मार्ग वळविण्यात आले आहेत तसेच काही गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे गाड्यांवर परिणाम झाला आहे - **मार्ग वळविण्यात आलेल्या गाड्या (दिनांक १५.०५.२०२५)** - गाडी क्र. ०९०६६ छपरा - सुरत विशेष गाडी ही भुसावळ, मनमाड, इगतपुरी, कल्याण, वसई रोड, सुरतमार्गे वळविण्यात आली आहे. गाडी क्र. १९०४६ छपरा-सुरत एक्सप्रेस ही भुसावळ, मनमाड, इगतपुरी, कल्याण, वसई रोड, सुरतमार्गे वळविण्यात आली आहे. गाडी क्र. २२७२३ नांदेड-श्री गंगानगर एक्सप्रेस ही जळगाव, भुसावळ, खंडवा, इटारसी, भोपाळ, उज्जैन, रतलाम, चित्तौडगड, अजमेर, मारवाडमार्गे वळविण्यात आली आहे. गाडी क्र. २०९३४ दानापूर-उधना एक्सप्रेस ही भुसावळ, मनमाड, इगतपुरी, कल्याण, वसई रोड, सुरतमार्गे वळविण्यात आली आहे. गाडी क्र. ०६१५७ चेन्नई सेंट्रल - भगत की कोठी विशेष गाडी ही भुसावळ कॉर्ड लाईन, खंडवा, इटारसी, भोपाळ, उज्जैन, रतलाम, चित्तौडगड, अजमेर, मारवाडमार्गे वळविण्यात आली आहे. गाडी क्र. २२९७२ पाटणा - बांद्रा टर्मिनस एक्सप्रेस ही भुसावळ, मनमाड, इगतपुरी, कल्याण, वसई रोड, बांद्रा टर्मिनसमार्गे वळविण्यात आली आहे. गाडी क्र. २०८६१ पुरी - अहमदाबाद एक्सप्रेस ही भुसावळ कॉर्ड लाईन, खंडवा, इटारसी, भोपाळ, उज्जैन, रतलाम, अहमदाबादमार्गे वळविण्यात आली आहे.

रद्द करण्यात आलेल्या गाड्या (दिनांक १५.०५.२०२५) - गाडी क्र. १९००४ भुसावळ - दादर एक्सप्रेस रद्द करण्यात आली आहे. गाडी क्र. १९००६ भुसावळ - सुरत एक्सप्रेस रद्द करण्यात आली आहे. गाडी क्र. १९००८ भुसावळ - सुरत एक्सप्रेस रद्द करण्यात आली आहे.

अमळनेर येथील मालगाडी अपघात झाला त्याठिकाणी खूप वेळ लागणार होता म्हणून तेथील लेबर जे काम करत आहेत त्यांच्या रात्रीची जेवणाची व पाण्याची व्यवस्था लायन्स क्लब, अमळनेरमार्फत करण्यात आली.

भाजपाची तिरपी चाल

चर्चा करत आहे. त्यांच्या अडचणी काय आहेत. आमच्या अपेक्षा काय आहेत, यावर नवीन काय करता येईल, याचा एकत्रीत विचार करत आहोत. यासाठी १५० दिवसांचा कार्यक्रमाचा दिला आहे. अनेक लोक चांगले काम करत आहेत. ते जोपर्यंत पदावर असतात, तोवर ते काम राहते, ते बदलल्यानंतर व नवीन कोणी आल्यावर त्यात बदल होते. असे न होण्यासाठी संस्थात्मक बांधणी करायची आहे, त्यासाठी या कार्यशाळा आयोजित केल्या जात आहेत. यानंतरही कार्यशाळा होणार आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

एसटीच्या ताफ्यात स्मार्ट बस येणार!

चालवण्याच्या पद्धतीवर देखील या कॅमेराचा तिसरा डोळा लक्ष ठेवून असणार आहे. तसेच बसस्थानक आणि परिसरामध्ये पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या बसेस देखील पूर्णतः बंद राहतील अशी यंत्रणा बसमध्ये बसविण्यात येणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले.

सध्या तापमान वाढीमुळे एसटी बसेसला आग लागण्याच्या घटना घडत आहेत. या आगीला प्रतिबंध करण्यासाठी फोमबेस आग प्रतिबंधक यंत्रणा लावण्यात येणार असून बसमध्ये ज्या ठिकाणी आग प्रज्वलित होईल, त्याचा शोध घेऊन त्या ठिकाणी संबंधित फोम वापरून आग तात्काळ विझवण्याची व्यवस्था या यंत्रणेत करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीला एस.टी. महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर आणि संबंधित खाते प्रमुखांसह बस बांधणी कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सुसंवादाला पर्याय नाही

असा मोकळेपणा निर्माण करणे आणि तो राखणे ही पालकांची जबाबदारी आहे. ज्यांना हे शक्य नसेल त्यांच्यासाठी समुपदेशकांचा मार्ग उपलब्ध आहे. पालक शिक्षकांनाही विश्वासात घेऊ शकतात. मुलांच्या वाढीला आणि सर्वांगीण विकासाला योग्य दिशा देण्यात शिक्षकांचा सहभाग अमूल्य आणि अपेक्षितही आहे. वयाच्या प्रत्येक टप्प्यावर मुलांची समज योग्य पद्धतीने कशी वाढेल याची काळजी पालकांनी घ्यायला हवी. ती समज वाढली तर सादरीकरणाच्या परिणामांची तीव्रता आणि मुले त्याच्या आहारी जाण्याचा धोका कदाचित कमी होऊ शकेल. पालक आणि मुलांच्या परस्पर संवादाचा अजून एक सकारात्मक परिणाम अनुभवाला येऊ शकेल. भविष्याच्या दृष्टीने मुलांच्या आवडीनिवडी, त्यांच्या मनाचा कल लक्षात येऊ शकेल. अडनिडे वय जसे मुलांसमोर प्रश्न निर्माण करणारे असते तसेच ते त्यांच्या कौशल्य विकासाचे देखील मानले जाते. कल लक्षात आला तर मुलांना त्या त्या प्रकारची कौशल्ये विकसित करण्यासाठी संवादाची मदतच होईल. अश्लील सादरीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या सूचना केंद्र सरकार अंमलात आणेल तेव्हा आणेल. पण तोपर्यंत पालकांचा उपरोक्त पुढाकार आणि सुसंवाद मुलांना आश्वासकच वाटेल.

कल्याण

दि.	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
१७-०३-२०२५ / २२-०३-२०२५	१ ३३ १ / ३ ३ ९ / १	६ ००३ / ७ ३ ४ / ७	४ १५ / ७ ० ५ / ०	८ ७९२ / ९ ८ / ०	२ ३१ / ५ ४ ५ / ७	२ ९५ / ३ ६ ५ / ४
३१-०१-२०२५ / ०५-०१-२०२५	१ १२३ / २ ३ ६ / ८	४ ०४३ / ६ ५ ६ / ०	८ ६६ / ८ ६ ६ / ० ७	१ ६१५ / ७ १ ६ / ८ ०	१ ६२१ / ६ ३ ८ / ९	२ ०२६ / ३ ७ ९ / ५
०७-०४-२०२५ / १२-०४-२०२५	१ ९१५ / ८ ८ / ०	२ ३६२ / ४ ६ ८ / ७	७ ४२ / ८ ३ ९ / ९	२ ६३६ / ७ ७ ० / ७	३ २३२ / ४ ३ ८ / ५	४ ९३६ / ६ ८ ९ / ९
१४-०४-२०२५ / १९-०४-२०२५	२ ४०३ / ५ ८ ९ / ७	२ ९६२ / ७ ६ ८ / ०	१ ६२५ / ६ ७ ० / ९	५ ८०२ / ५ २ ६ / ८	४ १५६ / ८ १ ८ / ९	३ ७६२ / ५ ४ ० / ९
२१-०४-२०२५ / २६-०४-२०२५	२ ३५५ / ४ ० ० / ७	४ ९१३ / ६ ३ ५ / ९	१ ४४२ / ४ ४ ८ / ९	२ ०८४ / ९ ५ ९ / ९	४ ३४७ / ९ ८ ९ / ०	२ ४६२ / ५ ६ ८ / ७
२८-०४-२०२५ / ०३-०५-२०२५	७ ४३२ / ८ ५ ६ / ९	१ १४१ / २ ६ ७ / ८	३ २५१ / ४ ६ ८ / ५	१ ६९१ / ५ ८ ० / ०	१ ०५१ / ३ ५ ९ / ६	१ ००६ / २ ० ९ / ७
२८-०४-२०२५ / ०३-०५-२०२५	१ ९८१ / ३ १ ६ / ५	४ ०४१ / ७ १ २ / ९	१ ०३१ / ३ ४ ८ / ६	१ ६२१ / २ ३ ८ / ३	१ ४७२ / ५ ६ ९ / ८	२ ४५२ / ५ ५ ८ / ७
१२-०५-२०२५ / १७-०५-२०२५	२ ८२३ / ३ ३ ६ / ३	५ ००३ / ६ ८ ९ / ९	२ ७४५ / ८ ९ ० / ८	२ ८३१ / ८ ५ ७ / ८		

मिलन डे

दि.	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि
१७-०३-२०२५ / २२-०३-२०२५	१ २८२ / ३ ६ ० / ८	७ ३७२ / ८ ५ ० / ८	३ ३८१ / ४ ७ ० / ६	१ ७१३ / ६ ८ ० / ०	१ ३४३ / ४ ५ ६ / ८	१ ०३६ / ४ ७ ० / ५	●
३१-०१-२०२५ / ०५-०१-२०२५	४ ४५१ / ५ ५ ९ / ५	६ ३६३ / ७ ६ ७ / ०	२ १९४ / ३ ६ ९ / ६	६ २६४ / ८ ४ ८ / ८	८ ५४३ / ८ ५ ६ / ९	१ ३४५ / २ ९ ० / ०	●
०७-०४-२०२५ / १२-०४-२०२५	३ ५१२ / ६ ९ ० / ६	२ ३११ / ४ १ ९ / ७	१ ६१४ / ५ ८ ९ / ०	१ ४०४ / ४ ७ ९ / ९	४ ४२१ / ४ १ ० / ६	१ ६६१ / ६ १ ४ / ९	●
१४-०४-२०२५ / १९-०४-२०२५	६ ९७३ / ६ ७ ७ / ७	१ ९२२ / ८ ४ ६ / ०	३ ४४१ / ४ ५ ८ / ७	१ ३८४ / ५ ५ ९ / ७	४ ९११ / ५ ३ ७ / ०	५ ७२५ / ५ ८ ९ / ७	●
२१-०४-२०२५ / २६-०४-२०२५	२ २६८ / ० ९ ९ / ०	५ ४१२ / ९ ४ ५ / ०	१ १७२ / २ ७ ८ / ८	२ २०५ / ३ ७ ८ / ७	१ ८५२ / ३ ३ ० / ४	२ ९०१ / ८ ३ ६ / ९	●
२८-०४-२०२५ / ०३-०५-२०२५	२ ३३३ / ३ ४ ६ / ८	१ ८६२ / ७ ४ ० / ०	४ २५१ / ४ ६ ८ / ४	३ ०३२ / ८ ३ ८ / ९	१ ७४६ / ७ ९ ९	●	●
२८-०४-२०२५ / ०३-०५-२०२५	१ ९९३ / ३ ७ ९ / ५	४ ७८१ / ४ ५ ० / ९	३ २६८ / ३ ८ ० / ६	२ ४८२ / ४ ७ ९ / ८	१ ३०४ / ६ ७ ९ / ६	५ ४८१ / ९ ८ ९ / ०	●
१२-०५-२०२५ / १७-०५-२०२५	१ ९६२ / ३ ६ ८ / ५	२ ८९३ / ८ ६ ० / ८	८ ७३५ / ९ ८ ० / ०	१ ३१६ / २ ६ ९ / ०			●

मिलन नाईट

सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
२ ०२३ / ९ ४ ५ / ९	१ ९०३ / ९ ७ ० / ९	१ ४६३ / १ ४ २ / २	१ २१५ / ३ ६ ९ / ८	३ २३१ / ४ ३ ९ / ५	१ ८८३ / १ ५ ० / ६
२ ३७१ / ४ ७ ९ / ७	६ ५१३ / ९ ३ ७ / ०	३ ३२२ / ३ ४ ७ / ७	१ ३७४ / २ ९ ० / ०	२ २३२ / ० ४ ७ / ०	२ ८४२ / ६ ३ ९ / ०
२ ८०१ / ८ २ ० / ०	८ ६५४ / ८ ९ ० / ०	४ ६१३ / ५ ८ ७ / ७	१ २५६ / २ ६ ९ / ९	८ ६४१ / ८ ५ ० / ०	५ ४५१ / ९ ७ ० / ०
३ ८०३ / ६ ३ ४ / ९	५ ९३५ / ६ १ ७ / ८	१ ६७२ / ६ १ ० / ०	१ ७८६ / ७ १ ० / ०	२ ०७१ / ४ ६ ० / ४	२ ६२७ / ४ ० ० / ०
१ ४०६ / ४ ५ ९ / ५	२ २८८ / ४ ६ ९ / ६	१ ८४६ / ५ ६ ० / ०	१ २७६ / ५ ६ ० / ६	२ ०५६ / ३ ५ ० / ५	१ ९४१ / २ ६ ९ / ६
२ ३४१ / ३ ३ ९ / ९	२ ०५८ / ० ० ० / ०	१ ५४३ / ५ ८ ३ / ८	१ ५५६ / ५ ९ ८ / ९	६ ०५१ / ६ ८ ० / ८	२ ३९६ / ४ ४ ० / ४
२ ५६४ / ५ ६ ६ / ९	३ ४५३ / ४ ८ ० / ०	३ ५९७ / ५ ७ ९ / ७	२ ५६७ / ५ ८ ८ / ८	२ ७८८ / ७ ९ ० / ९	१ ६४४ / ६ ७ ९ / ७
१ ६४१ / ७ ७ ९ / ७	४ ६७९ / ६ ७ ० / ७	२ ३०६ / ३ ५ ० / ५	१ ७७२ / ७ ९ ३ / ९		

क्लासिफाईड

पाहिजेत

हेअर कटींग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहीजेत. न्हावी समाजाच्या गरिब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीक पासुन ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यन्त मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवनाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहणाऱ्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकून गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो.नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही. एम./ ०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00505)

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इजंक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२६)(CRINV-2425JL/CRG00504)

१००% व्यसनमुक्ती

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी.डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२,www.drpalvenashamuktikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही.एम./०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00503)

जाहिरात छोटी किमया मोठी

छोटी जाहिरात संकलन केंद्र

जळगाव शहरात देशदूततर्फे छोट्या जाहिरातदारांचा सोयीसाठी खालीलठिकाणी छोटी जाहिरात संकलन केंद्र सुरु करण्यात आले आहे. तरी छोट्या जाहिरातदारांनी त्याचा लाभ घ्यावा.

क्रिविक ॲड.-३७६ जय किसनवाडी, जीएस ग्राउंडसमोर, जळगाव, मो.९६७३७७७१२२.
व्ही.एम.स्पेस - एफ.१५, दुसरा मजला, गोलाणी मार्केट, ०२५७-२२४०७१०, ३२९२३७३, मो.९३७०१९७११०.
चंचल कम्युनिकेशन - दौलत नगर, मोहाडी रोड, मो. ९४२३९५४४६०, ९४०३४८२८९६.
मल्हार कम्युनिकेशन - मेहरुण तलाव परिसर, सेंट टेरेसा स्कूल मागे, जळगाव मो. ९३७००७७३१२
ईश्वर ॲड एजन्सी - २३ दिनानाथवाडी, रिंगरोड. ०२५७-२२२९७००, मो.९४२२२०४६३३, ९४२२७७६४८८.
रुपाली ॲड.- बी-७, दुसरा मजला, रॉयल ट्रॅव्हल्सच्यावर, गोलाणी मार्केट, जळगाव. मो.७५०७७७७७०४.
लकी ॲड. - जिजाऊ नगर, जळगाव. मो. ९३२५३५६४४९
मुदंडा ॲड. - १७९, नवीपेठ, ०२५७- २२३६७७५. मो.नं. ९८९०६७३८२०.
श्रेयस ॲड.-सी-१५२, पहिला मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. मो.९८६०८४९०४८.
गणपती ॲड. - गट नं.५८/७, प्लॉट नं. २/२, रुबी बिल्डिंग मागे, लक्ष्मीनारायण नगर, अयोध्यानगरजवळ, जळगाव. मो. ९८२३०२१०३३.
यश ॲड.- न्यू.बी.जे.मार्केट जळगाव मो.८७९३१३२८१५.
गोपाळकृष्ण ॲड.- कोयल निवास, श्रध्दा कॉलनीजवळ, जळगाव. मो. ८८३०८१८६७६.
नेवे ॲड.-रामभाऊ जोशी मार्केट, जळगाव मो.९८२३०१५६०३
ओम ॲड.-सी-२९/३४, दुसरा मजला गोलाणी मार्केट, जळगाव मो. ९४२३१७५३४९

नशिबाची परीक्षा

शुक्रवार १६/०५/२०२५

*** मिलन डे ***
१३७ ३८० ३३५ — १-९ — २७० २८९ २२५ | सिंगल १-३-८
जोड १५-६९-३०-८१-९२

*** कल्याण बाजार ***
१६९ २६८ ६०० — ६-३ — १२० ३४६ ४५० | सिंगल ६-१-७
जोड ६०-६३-२१-७५-३९

*** मुंबई (मेन) बाजार ***
१५६ २४६ २२० — २-१ — १२९ १४६ ११९ | सिंगल २-४-६
जोड २०-८१-५४-६७-१९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

पाहिजेत

डीएड, बीएड झालेल्यांसाठी सुवर्णसंधी (वय ४० ४२ चालेल) एका खाजगी संस्थेसाठी,२ गरजूंनी भेटा मोबाईल नंबर ९८८१११६०३१ (दि.२०/५/२५)

खरेदी विक्री

जळगाव शहर परिसरात व जिल्ह्यात, प्लॉट, शेत, फ्लॅट, दुकान, घर, बंगला इ. खरेदी विक्रीसाठी व भाडयाने देणे घेण्यासाठी विश्वासनीय ठिकाण स्वामीकृपा ईस्टेट ब्रोकर जळगाव. आमच्याकडे सुंदर लोकेशन व दर्जेदार क्वॉलिटीचे बांधकाम असलेले गच्चीताबा बंगलोज, स्वस्त भावाच्या, जिरायत, बागायत, रोडटच, एन.ए. झोन शेतजमिनी विकणे आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

बुधवार १४/०५/२०२५
मेन बाजार -१२४-७१-५८८
मिलन ना.-१७९-७४-२३९

गुरुवार १५/०५/२०२५
मेन बाजार -
कल्याण-२८८-८३-१५७
मिलन डे -१२०-३१-६६९
मिलन ना.-

अशोक DOLBY DIGITAL (एअरकंडिशन में)

रोजाना १२,३,६ व ९ बजेसे
हॉरर, संस्पेस, डरावनी, कॉमेडीसे भरपूर
डेव्हिल डबल नेस्ट लेव्हल (हिन्दी)
तामिल का सुपरडूपर हिट कलाकार
(टिप - BMS पर online बुकींग शुरु है)

देशदूत सूचना

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.